नियमीत फौ. ख. क्र. ३२/२०१९
सरकार -वि.- राजेंद्र व इतर
नि.क्र. ७५.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - सुरेश गुलाबराव शिंदे,
वय ६० वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त,
राहणार – नागपूर, ता. नागपूर, जि. नागपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस. एस. मोरे यांचे मार्फत**

१. घटना दि.०४.११.२०१८ रोजी मौजा सालेभट्टी येथील उज्वला सुरेश शिंदे यांच्या शेतावर दुपारी १.०० ते १.३० वा. दरम्यान घडली होती. त्या दिवशी मी व माझी पत्नी उज्वला चना पेरण्याकरिता शेतावर गेलो होतो. त्यावेळी ट्रक्टरने चना पेरणी सुरु असताना राजेंद्र शिंदे व नैना राजेंद्र शिंदे तेथे आले व त्यांनी माझ्या व माझ्या पत्नीसोबत भांडण सुरु केले. त्यावेळी राजेंद्र शिंदे याच्या हातामध्ये लोखंडी पाईप होता. त्यावेळी मी धुऱ्यावर असताना राजेंद्र धुऱ्याजवळ आला व त्याने मला लोखंडी पाईपने हातावर, बगलेमध्ये, कमरेवर मारहाण केली. त्यावेळी मी माझी मोपेड गाडीजवळ गेल्यावर नैना शिंदे हिने माझी कॉलर पकडली. मी कसे तरी सोडवून मी माझ्या शेतामध्ये गेलो. त्यावेळी मी माझ्या पत्नीकडे गेलो असता अर्धा तासानंतर पवन जगताप व त्याच्यासोबत एक व्यक्ती माझ्या शेतावर आले. त्यांनी त्यांची गाडी रस्त्यावर ठेवली व माझ्याकडे शेतात पळत आले. त्यावेळी पवन जगताप याने मला पटकून पटकून मारले. त्यावेळी मी पेरणी आटोपून धुऱ्याकडे ट्रॅक्टरने गेलो असता पवन जगताप यांच्यासोबत आलेल्या अनोळखी इसमाने मला सांगितले की, समझोता करायचा आहे काय ? पवन जगताप मला मारहाण करीत असताना माझी पत्नी उज्वला मला सोडविण्याकरिता आली असता पवन जगताप याने तिचे ब्लॉऊज फाडले व काळी गळसोळी तोडली व तिला बुक्क्यांनी मारहाण केली. तो अनोळखी व्यक्ती मला समझोता करायचा आहे असे सांगितल्यानंतर मी त्याला सांगितले की, ठीक आहे ही केस इथेच मिटवून घेऊ पोलीस स्टेशनला काय जायचे, त्यावेळी तो मला म्हणाला की, ही मारामारीची केस नाही शेतीची केस मिटवून टाकू. त्यानंतर पेरणी करुन मी रस्त्यावर जाण्याकरिता निघालो असता राजेंद्र शिंदे, नैना शिंदे

व तो अनोळखी इसम पोलीस स्टेशनला जायला निघाले तसेच पवन जगताप कुठे तरी निघून गेला. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनला गेलो फिर्याद देण्याकरिता गेलो असता आमच्यापूर्वी राजेंद्र शिंदे पोलीस स्टेशनला पोहोचलेले होते व त्यांची फिर्याद नोंदविण्यात आली होती. त्यानंतर माझ्या पत्नीने पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. पोलिसांनी माझे बयान घेतले होते. आता साक्षीदाराला तपास अधिकारी यांनी जप्त केलेली काठी दाखविण्यात आली. साक्षीदार सांगतो मला लोखंडी पाईपने मारहाण करण्यात आली होती. ज्या पाईपने मला मारहाण करण्यात आली होती तो मी पोलिसांना दिला नव्हता. मी आरोपींना ओळखतो त्यापैकी राजेंद्र आज कोर्टात हजर आहे.

सरतपास संपला.

**आरोपींच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलट तपास तहकूब करण्यात येते.**

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक ०९.१२.२०२५

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.